I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 292-295
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि तीव्र समस्या : दीर्घकालीन दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. रवींद्र बापुराव शेंडे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

भारत ७५ वा स्वातंत्र्यमहोत्सव १५ ऑगस्ट २०२२ मध्ये साजरा करीत आहे आणि शतकोत्सवाच्या प्रवासाला सुरवात करीत आहे. ही निश्चितच जमेची आणि गौरवाची बाब असतांना वर्तमान स्थितितही तीव्र समस्या म्हणून ज्या समस्यांची ओळख भारतीय अर्थव्यवस्थेत आहे, त्या समस्या म्हणजे आर्थिक विषमता, महागाई, बेकारी, गरिबी आणि काही तात्कालीन समस्यांवर "लोकशाही हा विचार गट आहे" याचा पूर्णता वापर करून वरील समस्या नष्ट करणे अतिआवश्यक आहे.भारत हा जगातील अतिप्राचीन, शांतताप्रिय, खेड्यांचा, संस्कृतीप्रिय, जैवविविधता समृध्द, सर्व प्रकारची विविधता समृध्द देश असतांना विकसनशीलतेचा प्रवास अजून का संपला नाही याचा इतिहास खरोखर तपासणे वर्तमान पिढीला भाग झाले आहे. "नवा भारत" नवीन पिढि दुरूस्त करू शकते परंतु या पिढीला आवश्यक आहे, विषमताविरहीत वारसाहक्काचे प्रोत्साहन, असा वारसाहक्क मिळाल्यास विकास मोठा बनणारा आहे.जगाच्या पाठिवर निवडक देशच जैवविविधतेने समृध्द आहे. त्यात भारताचा क्रमांक लागतो. असा समृध्दतेचा वारसा असूनही वरील समस्या दुरूस्ती करण्यात प्रशासन असफल का होत आहे ? आणि सामान्य मनुष्य श्रीमंताच्या वागणूकीची किंवा श्रीमंत देशातील वर्तणूकीची नकल करीत असल्यामुळे तो साध्या–साध्या संधीना सोडत जात आहे काय? याचाही फेरविचार होणे अतिआवश्यक आहे. अतिरिक्त उत्पादन क्षमता अशा प्रभावामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे काय ? निर्माण होत असल्यास,तीव्र समस्यांच्या दुरस्तीसाठी अतिरिक्त–क्षमता नष्ट करणे प्रथम आवश्यक आहे.

**बीजशब्द :** विषमताविरहीत वारसाहक्क, आर्थिक सबलीकरण, आत्मनिर्भर आर्थिक भारत.

**प्रस्तावना :**

**संशोधन समस्या**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव १५ ऑगस्ट २०२२ रोजी साजरा होत आहे ही जमेची बाजू असतांना शासन व जनतेनी नवीन प्रशासकिय व्यवस्था निर्माण करून मूलभूत तीव्र समस्या सोडविण्यासाठी खास प्रयत्न करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर वरील विषयाची निवड व इतरही कारणामुळे विषयाची निवड करण्यात आली आहे.

**व्याप्ती आणि मर्यादा**

या शोधनिबंधात निवडक प्रवाहांचा आढावा घेण्यात आला आहे. शक्यतो अद्यावत माहितीचा आधार घेण्यात आला आहे. ही या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आहे.

**संशोधन पध्दती –**

या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णणात्मक व विष्लेशणात्मक पध्दतीचा वापर करतांना घटक विष्लेशण या पध्दतीचा वापर केला आहे. तथ्य संकलणासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेतला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१) गरिबी आणि बेकारी या दोनही जुळ्या समस्या आहे याचा अभ्यास करणे.

२) भारतातील आर्थिक विषमतेच्या प्रमुख कारणांचा अभ्यास करणे.

३) भारतातील संरचनात्मक बेकारीचा अभ्यास करणे.

४) राष्ट्राचे आर्थिक जीवण समृध्द करण्यासाठी किंमत स्थीरता आवश्यक बाब आहे याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीते**

१) बेकारी, गरिबी, आर्थिक विषमता आणि महागाई हे चारही प्रश्न परस्परपूरक आहे.

**विषयाचे विश्लेषण**

जगात गरिबी, बेकारी, आर्थिक विषमता आणि महागाई अशा समस्यांने ग्रस्त देशांच्या यादीमध्ये भारताचा समावेश होतो आणि हे तीव्र प्रश्न दीर्घकालापासून अस्तित्वात आहे. परंतु यासाठी तात्काल उपाययोजना करणे अतिआवश्यक आहे.

(अ) गरिबी –

भारतात गरिबीच्या संकल्पनेत राहणीमानाच्या किमान पातळीवर भर दिला आहे. गरिबीच्या संकल्पनेचा अभ्यास करतांना निरपेक्ष गरिबी आणि सापेक्ष गरिबी या दोन संकल्पना महत्वपूर्ण आहे. (१) निरपेक्ष गरिबी–निरपेक्ष या शब्दाचा अर्थ कोणाशीही तुलना न करणे असा होतो. म्हणजे निरपेक्ष गरिबी म्हणजे गरिब व श्रीमंत अशी तुलना

न करता आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी आजच्या किंमतीनुसार किती खर्च येईल हे होय. एकूणच व्यक्तीच्या आर्थिक स्थितीची विशिष्ट पातळी निश्चित करून त्याआधारे निरपेक्ष गरिबी काढण्यात येते. (२) सापेक्ष दारिद्रय – सापेक्ष गरिबीची संकल्पना आर्थिक विषमतेवर आधारित आहे.उत्पन्न पातळीनुसार गट पाडल्यास त्यातील शेवटच्या गटातील आर्थिक स्थिती म्हणजे सापेक्ष गरिबी होय.गरिबी ही सापेक्ष संकल्पना असल्यामुळे गरिबीची सर्वसमावेशक व काटेकोर व्याख्या करणे कठिण आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्याप्रमाणे जगता न येणे म्हणजे गरिबी होय. ६१ व्या राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षणनुसार ज्या व्यक्तींना दरमहा ग्रामीण भागात ३६५.३५ आणि शहरी भागात रूपये ५३८.६० इतके उत्पन्न मिळत नाही, ती व्यक्ती दारिद्रयामध्ये जीवन जगते असे समजावे.

रंगराजन समितीने (सन २०१२) आपला अहवाल ३० जून २०१४ रोजी शासनाकडे सादर केला.या अहवालानुसार दारिद्रयाचे मोजमाप हे मासिक दरडोई खर्चावरून केले गेले. शहरी भागात १४०७ रूपये आणि ग्रामीण भागात ९७२ रूपये उत्पन्न असल्यास त्या व्यक्तीला गरिब समजण्यात येईल. सन २०११–२०१२ मध्ये २९.५ टक्के लोक दारिद्रयात जीवन जगत होते. ग्रामीण भागात ३०.९ टक्के तर शहरी भागात हे प्रमाण २६.४ टक्के होते. रंगराजन समितीने दारिद्रयाच्या टोपलीत जीवणावश्यक घटकांबरोबर इतर घटकांचाही समावेश केला आहे.

नीती आयोगाच्या मते – (देशातील २५ टक्के जनता अत्यंत गरिब) नीती आयोगाने सध्याच्या दरडोई वापर आणि खर्चावर आधारित गरिबीच्या मापणाची पध्दत बदलवून आता विविध निकषांवर आधारित पध्दतीने हे मापन सुरू केले आहे. यामध्ये आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानासह पिण्याचे पाणी, मलनिस्सारण, घर, शाळा, बॅंक खाते अशा १२ घटकांच्या माहितीचे विश्लेषण केले जाते. भारतात यापुर्वी गरिबी मोजण्यासाठी प्रती दिन उत्पन्न आणि प्रती दिन किती कॅलरी घेतल्या जातात याचे मोजमाप केले जायचे आता मात्र विविध परिमाणांचा विचार केला जातो. आजच्या स्पर्धेच्या काळात भारतातील सामाजिक व आर्थिक संरचनेत बदल करणे कठिण असले तरी दारिद्रय नष्ट करणे शक्य आहे. यासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत धान्य पुरवठा जो कमी किंमतीत दिला जातो. तो अधिक किंमतीत खरेदी करण्याची ताकद प्रत्येक कुटूंबाची वाढणार यासाठी शासनाने व गरिब वर्गाने आत्मनिर्भर आर्थिक भारत या सुत्राचा वापर करणे आवश्यक आहे.

(ब) आर्थिक विषमता –

भारतात आर्थिक विषमतेचा प्रश्न अधिकच तिव्र बनत जात आहे. यासाठी लोकांमधिल नैसर्गिक भेद कारणीभूत नसून वारसाहक्काचा कायदा आणि खाजगी मालकीहक्क (संपत्तीवरील) ही दोन सबळ कारणांमुळे विषमता मोठी वाढत असून इतरही अनेक कारणे विषमतेसाठी जबाबदार आहे. कर्जवितरणातील फरक, शहरी भागात गुंतवणूकिचा कल, किंमतवाढ, मौद्रिक धोरणात हस्तक्षेप, राजकिय धोरणात क्षेत्रनिहाय पक्षपात यामुळे आर्थिक विषमता वाढत आहे. श्रीमंत व्यक्ती श्रीमंत बनत जात आहे आणि गरिब अधिक गरिब बनत जात असल्यामुळे आर्थिक विषमता विविध साधनांचा अपव्यय घडवून आणतांना दिसत आहे. आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेत प्रमुख करणांमध्ये दुरूस्तीकरण करणे आवश्यक आहे. ते याप्रमाणे (प) वारसाहक्काच्या कायद्यात मर्यादा घालणे अपेक्षित आहे. संपत्तीबाबत प्रत्येकी कमाल मर्यादा निर्धारित करणे (हम दो – हमारे दो आधारावर) (पप) संपत्तीची मर्यादा निर्धारित करणे – जास्तीत जास्त एवढी संपत्ती चल व अचल बाळगता येईल, पुढच्या संपत्तीवरील व्याज रूपी उत्पन्न शासनाला हस्तांतरीत होईल व मृत्युनंतर एका मर्यादेवरील संपत्ती शासन हस्तगत करेल, अशा मर्यादेमुळे हा प्रश्न काही प्रमाणात सुटणारा आहे. तसेच गरिबांचा दृष्टिकोन, श्रीमंत व्यक्तीचा दृष्टिकोन, मनाची स्वछता, महिला सबलीकरण, आर्थिक शिक्षण अशा उपाययोजनामुळे हा प्रश्न प्रथम सोडविणे अतिआवश्यक आहे.

(क) बेरोजगारी

अर्थव्यवस्थेतील एक महत्वाची समस्या म्हणून बेरोजगारी अथवा बेकारीकडे पाहिले जाते. लोकांना रोजगार उपलब्ध नसणे आणि रोजगार मिळावा यासाठी लोक धडपडत असणे या स्थीतीला बेरोजगार असे म्हणतात.आज कार्यकारी लोकसंख्येपैकी ८ : लोकसंख्या बेकार आहे. ती समस्या सोडविणे अत्यावश्यक आहे.

(१) चक्रीय बेरोजगारी – चक्रिय बेरोजगारी ही अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे निर्माण होते, ती मंदी असेपर्यंत राहते. बाजारचक्र सतत फिरत असल्यामुळे अर्थव्यवस्था मंदीतून जशी सुधारू लागते तश्या रोजगार संधी आपोआप निर्माण होतात.

(२) संरचनात्मक बेरोजगारी – कामगारांचे शिक्षण आणि कौशल्य एकीकडे आणि मालकाची गरज दुसरीकडे यात जेव्हा असंतुलन निर्माण होते तेव्हा उत्पन्न होणारी

बेरोजगारी ही संरचनात्मक बेरोजगारी असते. भारतात ही बेकारी वाढत आहे.

(३) संघर्षजन्य बेरोजगारी – प्रथमता रोजगार शोधू लागते किंवा एक असलेली नोकरी सोडून दुसरी अधिक चांगली नोकरी शोधतो त्या कालावधीतील बेरोजगारी म्हणजे संघर्षजन्य बेरोजगारी होय.

(४) हंगामी बेरोजगारी – हंगाम संपला की रोजगार संपतो ती बेकारी हंगामी बेरोजगारी होय. काही रोजगार संधी ह्या हंगामी असतात.

(५) अभिमत बेरोजगारी – जास्त पगाराची नोकरी करत असलेला व्यक्ती जूनी नोकरी काही कारणामुळे सुटल्यामुळे कमी पगारावर काम करण्यास तयार होत नाही त्यावेळी निर्माण होणाऱ्या बेकारीला अभिमत बेकारी असणे म्हणतात.

(६) छुपी बेरोजगारी – बेरोजगार असूनही रोजगार मागतच नाही किंवा सीमांत उत्पादन जेव्हा शून्य होते त्यावेळी छुपी बेकारी तिथे निर्माण होते.

भारतात वेगवेगळे बेकारीचे प्रकार अस्तित्वात आहे. त्यामुळे से च्या बाजार सिध्दांतातील युक्तता, केन्सच्या प्रभावी मागणी सिध्दांतातील युक्तता यातील समन्वयाने बेरोजगारीचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. (अस्तित्वात असलेल्या कामगारांच्या उत्पन्न करातून नवीन लोकांना किती रोजगार उत्तरोत्तर मिळत जाणार आहे यांचा अंदाज घेवून रोजगार द्यावा – से सिध्दांतात असा बदल) आणि केन्सच्या प्रभावी मागणी सिध्दांत या दोन्ही सिध्दांतातील समन्वयाने रोजगारीचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणारी आहे.

(ड) किंमत वाढ –

किंमत वाढ हा प्रश्न दुसऱ्या महायुध्दापासून सुरू झाला असून तो अजुनही कायम आहे तो सोडविणे अत्यावश्यक आहे. मागणी आणि पुरवठा यात फरक, खर्च आणि किंमत यात बीघाड, चलनवेग, चलणपुरवठा अशा वेगवेगळ्या कारणामुळे हा प्रश्न मोठा बनत चाललेला आहे. तसेच अनुकरण प्रभावाचा मोठा परिणाम किंमतवाढीवर होत असलेला पहायला मिळतो. या किंमत वाढीत गरिब आणि मध्यम वर्गाचे उत्पन्न वाढत असले तरी या वर्गाला मोठा त्रास सहण करावा लागतो आणि मंदीमध्ये तर पुन्हा बिकट परिस्थिती या वर्गाला आणि शासनाला सहन करावी लागते. किंमतस्थिरता निर्माण केल्याशिवाय विकास मोठा बनणार नाही या आधारे विविध धोरणांचा वापर व जनतेच्या आर्थिक व इतर सवयी चागल्या करणे अतिआवश्यक आहे.मौदिक आणि राजकोषीय धोरणामार्फत किंमत वाढीचा प्रश्न सुटू शकतो. परंतु त्याची अंमलबजावणी चांगली होणे आवश्यक आहे. मौदिक धोरणातल विविध साधनांचा वापर करणे आवश्यक आहे आणि राजकोषीय धोरणातील साधनांचा वापर झाल्यास व जनतेचे सहकार्य आणि बाजारातील चुकिच्या प्रथा नष्ट झाल्यास किंमत स्थिरता निर्माण होऊन विकासाचा प्रवाह मोठा बनणारा आहे. मुक्त बाजारपेठ हा किंमत स्थिरतेसाठी रामबाण उपाय नाही. शासकीय नियंत्रण व नियमनाद्वारे किंमत वाढीचा प्रश्न मिटविणे शक्य आहे.

**गृहितकाची पडताळणी –**

वर्तमान पिढीला सर्व सोयीसुविधा (आवश्यक) उपलब्ध करूण देण्याची जबाबदारी शासन व जनतेची एकत्र असतांना तीव्र समस्या सोडविण्यात शासन व जनता एकत्र अपयशी ठरत आहे आणि यामुळे बेकारी, विषमता, गरिबी, महागाई हे सर्व प्रश्न तीव्र बनत जात असलेले पहायला मिळतात. वास्तविक पाहता या सर्व समस्या शून्य असणे आवश्यक आहे परंतु अधिक उत्पादन – अधिक पैसा हा श्रीमंताचा दृष्टिकोन बनत चालल्यामुळे, तसेच आर्थिक विषमता हा विकासाचा खरा स्त्रोत आहे हा दृष्टिकोन श्रीमंताचा असल्यामुळे गरिबांना संधी देण्यात श्रीमंत वर्ग आणि शासन अपयशी ठरत आहे आणि गरिब वर्गाना याची जाणीव अजुनही न झाल्यामुळे हे सर्व प्रश्न परस्परपूरक असून तीव्र बनले आहे.थोडक्यात हे प्रश्न परस्परपूरक व तीव्र आहे हे गृहितक सत्य आहे.

**समारोप :–**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव १५ ऑगष्ट २०२२ रोजी साजरा होत आहे ही जमेची बाजू असतांना शासन व जनतेनी नवीन प्रशासकिय व्यवस्था निर्माण करून मूलभूत तीव्र समस्या सोडविण्यासाठी खास प्रयत्न करणे गरजेचे आहे. बेकारीसाठी (से च्या बाजारनियमातील काही बाबी– उदा. वेतनधारी लोकांच्या उत्पन्न कर कपातीतून नवीन रोजगार उपलब्ध करून देणे आणि केन्सच्या सिध्दांताचा पूर्ण आधार) किंमत स्थिरतेसाठी – मुक्त बाजारपेठेसोबत शासकिय नियंत्रण व नियमन यांचा वापर, आर्थिक विषमतेकरीता – वारसाहक्कातील मालमत्तेत मर्यादा आणि गरिबीसाठी – आत्मनिर्भर आर्थिक सवयी अशा सर्व उपाययोजनाद्वारे पुढच्या पिढीला समृध्द वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

गोविलकर वि. म., अर्थजिज्ञासा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर २०१९.

अर्थसंवाद, आक्टोंबर – डिसेंबर २०२१/खंड ४५, अंक ३

ओसरकर सु. रा., राजस्व, विद्या प्रकाशन, नागपूर

पाटील जे. एफ., सार्वजनिक अर्थकारण, फडके प्रकाशन कोल्हापूर
अर्थब्रम्ह – लोकसत्ता २०१७, २०१८, २०१९
अर्थसंवाद – मराठी अर्थषास्त्र परिशदेचे त्रैमासिक, खंड ४०, ४१
भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) डॉ. विनायक देशपांडे, हिमालाया पब्लीषिंग, नागपूर २०१०.